नि.दि.दा.क्र.७४/२०२४

ज्ञानोबा वि... संभाजी

## निशाणी क्र. १२ वरील अर्जांवर आदेश

CNR NO- **MHLA**15000425-2024

सदरचा दावा वादी यांनी कायमस्वरुपी मनाईहुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे व न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. सदरचे अर्जामध्ये वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करावयाचा अर्ज नि.क्र. १२ वर दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये, वादी यांनी असे नमुद केले आहे की, प्रस्तूत दावा वादीने वाद जमीनीबाबत कायमस्वरुपी मनाईहुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीने दावा दाखल करत असताना सदर दाव्यामध्ये दावा मागणी रखान्यामध्ये कायमस्वरुपी मनाईहुकूम बाबत च्यापूढे **"व हद्द कायम करून मिळणेबाबत"** व परीच्छेद क्र. ३ मध्ये शेवटच्या ओळीपासून पूढे **"प्रतिवादी क्र. ते १६ वादीला म्हणाले तूझी मालकी येथे इथपर्यंत येत नाही. तूझ्या ताब्यात आमची जमीन आहे, तुझी जमीन मोजून घे व हद्दी कायम केल्यानंतर जमीनीमध्ये ये म्हणून अडथळा केला तेंव्हा उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, चाकूर यांच्या कडे मोजणीसाठी गेलो असता भूमी अभिलेख कार्यालय यांनी कोर्ट आदेशाशिवाय पोट हिश्याची मोजनी करून हद्द कायम करता येणार नाही म्हणून मोजणी नाकारली उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, चाकूर यांना कोर्ट कमीशनर म्हणून नेमणून करुन वादी व प्रतिवादी यांच्या गट नंबर ५८ मधील ५८/६, ५८/३/२, ५८/१/१, ५८/२/२, ५८/७, ५८/३/१, ५८/८, ५८/९, ५८/१/२, ५८/५, ५८/२/१, ५८/४/१ वरील नमूद क्षेत्राप्रमाणे ज्याचे त्याच्या मालकी कब्जाची जमीन**

**मोजून हद्दी कायम करणे गरजेचे आहे. त्या बाबत वादी मोजणी करून हद्द कायम करणेबाबत उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय चाकूर यांना कोर्ट कमीश्नर म्हणून नेमणूक करणेबाबतचा वेगळा अर्ज दाखल करीत आहेत."**

**सदरील बाबी मुळ दाव्यामध्ये दावा मागणी रखान्यामध्ये** कायमस्वरुपी मनाईहुकूम बाबत च्यापूढे **"व हद्द कायम करून मिळणेबाबत"** तसेच परीच्छेद क्र. ३ मध्ये शेवटी वर नमूद आधोरेखांकीत बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती नजरचूकीने व अनावधानाने सदर दाव्यात समावीष्ठ करन्याची राहून गेली आहे. त्यामूळे सदर मुळ दाव्यामध्ये हद्द कायम करून मिळणेबाबत व परीच्छेद क्र.३ च्या शेवटी वरील बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने विनंती प्रमाणे तशी दुरुस्ती दाव्यात करण्याची परवानगी मागीतली.

३. तसेच सदरची दुरूस्ती केल्यास प्रतिवादीचे नूकनासन होणार नाही तसेच दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. या उलट सदर दूरूस्तीमध्ये न्यायालयासमोर योग्य त्या बाबी अभिलेखावर येवून प्रकरणातील सत्य बाबींचा उलगडा होवून प्रकरण गुणवत्तेवर निकाली निघन्यास मदत होणार आहे. दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी वादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादीस पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात येतो.

५. अर्ज पाहिला. वादीचा युक्तिवाद ऐकला. अर्जातील कथनानुसार मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. सदर दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, **सदरील बाबी मुळ दाव्यामध्ये दावा मागणी रखान्यामध्ये** कायमस्वरुपी मनाईहुकूम बाबत च्यापूढे **"व हद्द कायम करून मिळणेबाबत"** तसेच परीच्छेद क्र. ३ मध्ये शेवटी वर नमूद आधोरेखांकीत बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. सदर

दुरुस्ती नजरचूकीने व अनावधानाने सदर दाव्यात समावीष्ठ करन्याची राहून गेली आहे. त्यामुळे वादीने केलेल्या विनंती प्रमाणे तशी दुरुस्ती दाव्यात करण्याची परवानगी मागीतली.

५. तसेच सदर दुरुस्ती नजरचूकीने व अनावधानाने सदर दाव्यात समावीष्ठ करन्याची राहून गेली आहे. तसेच सदरची दुरूस्ती केल्यास प्रतिवादीचे नूकसान होणार नाही तसेच दाव्याच्या मुळ स्वरूपात , दावा दाखल करण्यास उद्भवलेल्या तारखेत कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. या उलट सदर दूरूस्तीमध्ये न्यायालयासमोर योग्य त्या बाबी अभिलेखावर येवून प्रकरणातील सत्य बाबींचा उलगडा होवून प्रकरण गुणवत्तेवर निकाली निघन्यास मदत होणार आहे. दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी प्रस्तुतच्या अर्जाच्या मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास दावा गुण–दोषावर न्यायनिर्णीत होण्यास मदतच होणार आहे. त्यामूळे दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी वादीने मागणी केलेली दुरुस्ती अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे, त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**–आदेश–**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचे अर्ज मंजूर करण्यात येत आहेत. |
| २. | वादीने सदरच्या अर्जाप्रमाणे मागितलेली दुरुस्ती १४ दिवसाच्या आत करावी. |
| ३. | वर नमुद दुरुस्ती केल्यानंतर अर्जदाराने दुरुस्त दावा प्रत १४ दिवसाच्या आत सदर अर्जात दाखल करावी.<br>**(आदेश खुल्या न्यायालयात वाचला).** |

MANGESH SUBHASH LUNIYA
Digitally signed by MANGESH SUBHASH LUNIYA
Date: 2025.04.24 16:41:43 +0530

(एम.एस. लुनिया)

दि. २४/०४/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.

चाकर

CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D.F. file order are same as per original order.

Name of steno : M.B. Pathan

Court Name : M.S. Luniya, J.M.F.C.,Court No.2 Chakur.

Order Date : 24/04/2025

Order signed by presiding officer on : 24/04/2025

Order Uploaded on : 24/04/2025